सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६—२७/३४७ तातडीचे/अतिमहत्त्वाचे दि. १४/११/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मधील राष्ट्रीय सेवा योजना(रासेयो) अनुदान PFMS-TSA Hybrid प्रणालीद्वारे प्राप्त करणे, तसेच शासनाने उपलब्ध करून दिलेल्या Google Sheet मध्ये निधी विनियोगाची माहिती तातडीने भरण्याबाबत...

संदर्भ: १.विद्यापीठाचे परिपत्रक क्र.रासेयो/२०२६—२७/२६५, दिनांक ३०/०९/२०२६
http://collegecirculars.unipune.ac.in/sites/documents/NSS%20Circulars/Regarding%20the%20expenditure%20of%20funds_30092026.pdf
२.विद्यापीठाचे परिपत्रक क्र.रासेयो/२०२६—२७/३३७, दिनांक ०२/११/२०२६
http://collegecirculars.unipune.ac.in/sites/documents/NSS%20Circulars/PFMS%201st%20UNIT%2050percent%20Advance%20Letter_04112026.pdf
३. मा.राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचे क्र.रासेयो–२०२६/प्र.क्र.८६/रासेयो कक्ष,दि.१३ नोव्हेंबर, २०२६रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्र क्र. १ व २ नुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६—२७ करिता PFMS-TSA Hybrid प्रणालीअंतर्गत प्रथम रासेयो एककासाठी ५० टक्के अनुदानाची मर्यादा म्हणून रू.३७,५००/— इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सदर निधी PFMS प्रणालीद्वारे प्राप्त करून त्याचा विनियोग करण्याबाबत विद्यापीठामार्फत संदर्भ क्र. १ व २ अन्वये यापूर्वी दोन वेळा स्वतंत्र परिपत्रके काढून निधी प्राप्त करण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया व मार्गदर्शक सूचनादेखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

तथापी विद्यापीठामार्फत परिपत्रकाद्वारे सूचना देऊनही त्याचबरोबर NSS WhatsApp ग्रुपवर सर्व कार्यक्रम अधिकारी यांना वारंवार सूचना देऊनही अद्‌ध्याप काही महाविद्यालयांनी PFMS-TSA Hybrid प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेला निधी प्राप्त केला नसल्याचे आणि शासनाच्या पत्रानुसार निधी प्राप्त व विनियोगाबाबतची आवश्यक माहिती Google Sheet मध्ये भरलेली नाही असे निदर्शनास आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. तरी सर्व संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्य यांनी कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत खालील कार्यवाही तातडीने पूर्ण करून घ्यावी.

१.PFMS-TSA Hybrid प्रणालीमध्ये उपलब्ध असलेला संपूर्ण रू.३७,५००/—निधी तात्काळ प्राप्त करून घ्यावा.

२.निधी प्राप्त केला असल्यास प्रत्यक्ष खर्च व शिल्लक रकमेची, तसेच निधी प्राप्त केला नसल्यास त्याचे स्पष्ट कारण शासनास Google Sheet मध्ये नमूद करावे.

३.यापूर्वी माहिती भरली असल्यास ती तपासून आवश्यक त्या दुरूस्त्या कराव्यात.

Google Sheet Link :
https://docs.google.com/spreadsheets/d/1pK8N6k3ESOqLGEbgnCY1VL03dftnOPultIPydQtIj44/edit?usp=sharing

शासनाकडून सदर माहिती तातडीने मागविण्यात आलेली असून, उपलब्ध निधीचा विनियोग व माहिती सादरीकरण यावर पुढील ५० टक्के अनुदानाचे वितरण अवलंबून आहे. त्यामुळे कोणत्याही महाविद्यालयाने या सूचनेकडे दुर्लक्ष करू नये. सदर कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य/संचालक व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी. कळावे, ही विनंती.

संचालक(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र. ८६/रासेयो कक्ष, दि: १३ नोव्हेंबर, २०२६

तात्काळ / अति महत्त्वाचे

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे / संचालनालये / संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत SBI द्वारे पडताळणी झालेल्या ZBSA/ रा.से.यो. एककांना वितरित निधीच्या विनियोगाबाबतची माहिती तातडीने सादर करण्याबाबत..

संदर्भ :- १. राष्ट्रीय सेवा योजना, प्रादेशिक संचालनालय, पुणे यांच्याकडून दिनांक ३० ऑक्टोबर व ४ नोव्हेंबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या सूचना.
२. सप्टेंबर व ऑक्टोबर २०२६ मध्ये निधी वितरण व विनियोगाबाबत यापूर्वी पाठविण्यात आलेले पत्रव्यवहार व मार्गदर्शक सूचना.
३. युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे निर्देश.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भान्वये कळविण्यात येते की, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील २५०७ SBI द्वारे पडताळणी झालेल्या ZBSA / NSS युनिट्सना वितरित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना निधीच्या विनियोगाबाबतची सद्यस्थिती सादर करणे आवश्यक आहे.

सदर योजनेअंतर्गत संबंधित NSS युनिट्सना प्रथम NSS युनिटसाठी ५०% निधी म्हणून रु. ३७,५००/- इतका निधी PFMS प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेला आहे.

या अनुषंगाने, आपल्या विद्यापीठ / संचालकालयाच्या कार्यक्षेत्रातील SBI पडताळणी झालेल्या NSS युनिट्स / ZBSA यांची विद्यापीठनिहाय यादी व माहिती भरण्यासाठी संबंधित Google Sheet ची लिंक सोबत देण्यात आलेली आहे.

तरी आपण आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांच्या NSS कार्यक्रम अधिकाऱ्यांशी समन्वय साधून खालील माहिती संबंधित Google Sheet मध्ये तातडीने अद्ययावत करावी.

- संबंधित NSS युनिटला प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगाची सद्यस्थिती.
- निधीचा विनियोग झालेला असल्यास खर्चाची माहिती.

- निधीचा विनियोग झालेला नसल्यास त्याची स्पष्ट कारणे.
- निधी विनियोगासंदर्भातील आवश्यक इतर माहिती.

सदर माहिती दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अनिवार्यपणे अद्ययावत करून सादर करावी. मंत्रालयास विहित वेळेत एकत्रित अहवाल सादर करावयाचा असल्याने या कामास सर्वोच्च प्राधान्य देऊन कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच, आपल्या स्तरावरून सर्व संबंधित NSS युनिट्सना तातडीने सूचना देऊन निर्धारित मुदतीत माहिती भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

सदर बाब तातडीची व अत्यंत महत्त्वाची असल्याने, विहित कार्यवाहीस प्राधान्य देण्यात यावे.

(डॉ. मिलिंद काळे)

राज्य संपर्क अधिकारी / वि.का.अ.

राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय कक्ष.

प्रत :-

१. मा. अप्पर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. वित्त व लेखा अधिकारी (सर्व विद्यापीठे / संचालनालये / संस्था) माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
३. रासेयो क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचालनालय, पुणे